अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org

अपील क्र.७१/२०२४

जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/ ५१०९ दि.१२/८/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७१/२०२४

श्रीमती पुष्पावती सुकल,

१०१, जीवन विकास नगर,

कुमठा नाका, सोलापूर-४१३००३

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्रीमती पुष्पावती सुकल, सोलापूर-४१३००३ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२७/६/२०२४ (आ.क्र.५०२५, दि.२८/६/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/३२६९, दि.०२/७/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २७/६/२०२४ | २८/६/२०२४ | २७/७/२०२४ | ०२/७/२०२४ | ० |

स्वच्छता निरिक्षक पदासाठी आपण प्रसिद्ध केलेल्या पात्र उमेदवारांच्या शैक्षणिक दाखले व अनुभव प्रमाणपत्र देण्यास आपल्या कार्यालयाला अडचणीचे का आहे? आणि या पात्र उमेदवाराने नियुक्ती दिली आहे का? याचा खुलासा द्यावा, असे नमूद करुन दि.०८/७/२०२४ रोजी (आ.क्र.५८३० दि.०९/७/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०८/७/२०२४ | ०९/७/२०२४ | ०१/८/२०२४ | होय | -- |

सदर अपिलाची सुनावणी दि.६/८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/४४९१ दि.३१/७/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

स्वच्छता निरिक्षक पदासाठी आपण प्रसिद्ध केलेल्या पात्र उमेदवारांच्या शैक्षणिक दाखले व अनुभव प्रमाणपत्र देण्यास आपल्या कार्यालयाला अडचणीचे का आहे? आणि या पात्र उमेदवाराने नियुक्ती दिली आहे का? याचा खुलासा द्यावा, असे नमूद करुन दि.०८/७/२०२४ रोजी (आ.क्र.५८३० दि.०९/७/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत "स्वच्छता निरिक्षक पदासाठी पात्र झालेल्या उमेदवारांचे कागदपत्र पडताळणीसाठी असलेले कागदपत्रे, पात्र व अपात्र उमेदवारांचे सर्व कागदपत्रे (आपण दिलेल्या कागदपत्र यादीप्रमाणे असावेत) दि.२७/६/२०२४ (आ.क्र.५०२५, दि.२८/६/२०२४) मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/३२६९, दि.२/७/२०२४ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८(१)(झ) नुसार माहिती नाकारली आहे.

<u>अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित होत्या.</u> "मला दि.६/८/२०२४ रोजी स.११.०० वा. अपिल सुनावणीस काही घरगुती कारणास्तव उपस्थित राहता येणार नाही. तरी आपण जी काही माहिती आहे. ती, ऑनलाईन पद्धतीने पुरविण्यात यावी", असे नमूद करुन आ.क्र.७७३९ दि.२/८/२०२४ रोजी लेखी म्हणणे पत्राद्वारे कळविले आहे.

आरोग्य निरिक्षक पदाच्या भरतीची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने दिलेली माहिती योग्य आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले.

आरोग्य निरिक्षक पदाची नेमणूकीची प्रक्रिया सुरु आहे. दि.२१/०६/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले जाहीर प्रकटन हे फक्त आरोग्य निरीक्षक (श्रेणी-३) पदाकरिता पात्र व अपात्र उमेदवारांची प्रथमदर्शनी यादी आहे. यामध्ये उमेदवारांकडून हरकती/सूचना ७ दिवसाचे आत सेवाभरती व परीक्षा नियंत्रण विभागाकडे लेखी स्वरुपात सादर करण्यास सांगितले आहे. सध्यस्थितीत सदर अभिलेखे गोपनीय स्वरूपाचे असल्याने प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच सार्वजनिक स्वरुपाचे अभिलेखे उपलब्ध करून देणे शक्य आहे, असे अपिलाधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले आहे. सबब, उपलब्ध कागदपत्रे व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग यांनी दिलेली माहिती योग्य आहे. त्यानुसार, सदर अपिल क्र.७१/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P.Patil
12-8-24

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.